# अनघावार्ता

अंक पहिला

१४ एप्रिल २०१९

अनघाचा ४०वा वर्धापन दिन

अनघा प्रकाशन
ठाणे (पूर्व)



खाजगी वितरणासाठी

**संपादक**
विद्या नाले

**संपादन सहाय्य**
मुरलीधर नाले

**मुखपृष्ट सजावट**
रघुनाथ गुराम

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
अनघा प्रकाशन
१६, श्रीसदिच्छा
मीठबंदर रोड,
चेंदणी, ठाणे (पूर्व)
अक्षर मुद्रण

**अक्षरजुळणी**
अथर्व क्रिएशन, ठाणे
मो.नं. : ९८३३८३९२०३

**मुद्रक**
संकल्प प्रिंटर्स, ठाणे

**खाजगी वितरण**

- संपादकीय - विद्या नाले
- अनघाची वाटचाल - अमोल नाले
- मधु मंगेश कर्णिक - व्यक्ती, लेखक आणि संस्था - प्रा. अनंत देशमुख
- एक अतूट नाते - प्रकाश लेले

**पुस्तक परीक्षण**

- हिमशिखरांच्या सान्निध्यात - पूर्णिमा शेंडे
- खिरमट - शशिकांत तिरोडकर

- **लेखक परिचय**

- पद्मश्री मधु मंगेश कर्णिक - मुरलीधर नाले

या अंकातील विचारांशी संपादक सहमत असतील असे नाही.

# रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळालेली आमची प्रकाशने

- ⋆ राजा थिबा - मधु मंगेश कर्णिक
- ⋆ मेघदूत - शरद काळे, I.A.S.
- ⋆ श्रीमद्‌भगवतगीता - शरद काळे, I.A.S.
- ⋆ कधी बहर कधी शिशिर - पं. यशवंत देव
- ⋆ स्मरण - डॉ. भारतकुमार राऊत
- ⋆ गीता आनंद यात्रा - डॉ. भारतकुमार राऊत
- ⋆ विभ्रम - डॉ. विलास खोले
- ⋆ विमर्श - डॉ. विलास खोले
- ⋆ सुलोचना - वसंत भालेकर
- ⋆ वटवृक्षाच्या सावलीत - डॉ.एन.जी.राजूरकर
- ⋆ दीपस्तंभ - डॉ. एन. जी. राजूरकर
- ⋆ वाचा आणि वेचा - डॉ. विजय पांढरीपांडे
- ⋆ शिक्षण समजून घेतांना - डॉ.नीता पांढारीपांडे
- ⋆ खिरमट - डॉ. महेश केळुसकर
- ⋆ टीझर - डॉ. मोहिनी वर्दे
- ⋆ नर्गिस - रमेश उदारे
- ⋆ संजीवन पाथेय - डॉ. व्ही. के. गोकाक
- ⋆ अमृता प्रीतम - चंद्रकांत भोंजाळ
- ⋆ विज्ञानवाटा - जोसेफ तुस्कानो
- ⋆ यशवंतराव चव्हाण जडणघडण
  - सं. मधु मंगेश कर्णिक
- ⋆ हिमशिखरांच्या सान्निध्यात - प्रकाश लेले
- ⋆ स्वरांत - भारत सासणे
- ⋆ श्वास आणि इतर कथा - माधवी घारपुरे
- ⋆ सुखासही भोवळ येते - डॉ. प्रदीप कर्णिक

# संपादकीय...

गेली ४० वर्षे अनघा प्रकाशन दरवर्षी दिवाळी अंक नियमित प्रकाशित करीत आहे. तसेच गेल्या ४० वर्षाच्या कालावधीत मान्यवर लेखकांच्या बरोबर नवोदित लेखकांची पुस्तके प्रकाशित करण्याचा योग आला आहे. अनघा प्रकाशनाची सुरूवात विजय तेंडुलकर, ना.ज. जाईल, शं. ना. नवरे व सुरेश भट यांच्या मार्गदर्शनानुसार सुरु झालेली आहे. शेकडो पुस्तके प्रकाशित करुन आज महाराष्ट्रात अनघा प्रकाशनाने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेले आहे.

आजच्या जाहिरातीच्या युगात मात्र वर्तमानपत्रातील जाहिरात असो की इलेक्ट्रॉनिक मिडियाद्वारा जाहिरात करावयाची असो त्यासाठी भरपूर पैसे मोजावे लागतात. परिणामी या पथावरुन आपली जाहिरात करणे सर्व प्रकाशकांना शक्य होत नाही. उत्तम साहित्य प्रकाशित करून मराठी रसिकांना त्यांची चांगल्या साहित्याची अभिरूची जपण्याचा प्रयत्न करीत अनघा प्रकाशनाने आपली वाटचाल चालू ठेवलेली आहे. ग्रंथालये, मराठी रसिकांचा लाभलेला प्रतिसाद अनघा प्रकाशनाला सतत उत्तेजन देत आलेला आहे.

अनघा प्रकाशनाची पुस्तके, लेखक यांचा परिचय ग्रंथालये व मराठी रसिकांना व्हावा तसेच लेखकांना आपल्या प्रकाशनाची वाटचाल कशी चालू आहे याची सविस्तर माहिती मिळावी या उद्देशाने 'अनघा वार्ता' हे खाजगी वितरणाची पुस्तिका आज प्रकाशित करतांना मला आनंद होत आहे. संबंधितांनी या संदर्भात काही सुचना असल्यास त्या कळविल्यास सुधारणा करणे सोईचे होईल.

**- विद्या नाले**

# अनघाची वाटचाल

१९७९ यावर्षी विजय तेंडुलकरांच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली वडिलांनी अनघा प्रकाशनाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्यामुळे अरुण लिमये यांची अपूर्णावस्थेतील कादंबरी मिळाली. तर त्यांच्या सुचनेनुसार अशोक शहाणे यांची अनुवादित कादंबरी मिळाली. ते बंगाली वाङ्मय मराठीत आणणारे दिग्गज लेखक. 'मोतीनंदी' या सुप्रसिद्ध बंगाली लेखकाची ती प्रसिद्ध कादंबरी. अर्थात काही कारणाने तो प्रकल्प अर्ध्यावरच बंद पडला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीने अनघा प्रकाशनाची खरी सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात ना.ज.जाईल, वसु भगत, यांच्या कादंबऱ्या प्रकाशनासाठी लाभत गेल्यात. नंतर अनघाच्या प्रवासात कथासंग्रह प्रकाशनासाठी येऊ लागले व प्रकाशनाची गती हळू हळू वाढू लागली. वडिल शासकीय अधिकारी असल्यामुळे त्यांना प्रकाशनासाठी जास्त वेळ देता येईना. त्यामुळे कासवाच्या गतीनेच प्रकाशन पुढे सरकत होते. वर्षाला ६ पुस्तके मात्र नियमितरित्या प्रकाशित होत होती.

वडील सेवानिवृत्त झाल्यावर मात्र त्यांना पूर्णवेळ प्रकाशनासाठी देता येऊ लागला. मग २००४ यावर्षी अनघा प्रकाशनाचा रौप्यमहोत्सव ३३ पुस्तकांच्या प्रकाशनाने मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमारजी शिंदे यांच्या हस्ते पार पडला. ३३ लेखक जातीने हजर होते त्यात प्रामुख्याने माधव गडकरी, यशवंत देव, वसंत भालेकर, अशोक जैन, अशोक राणे, डॉ.मोहिनी वर्दे, इसाक मुजावर इत्यादींचा समावेश होता. मुख्यमंत्री महोदयांनी वडिलांना गौरव केला व या उपक्रमाचे तोंडभरुन कौतुक केले. या सर्व सोहळ्याने मी हरखून गेलो व त्या रात्री वडिलांना सांगितले की, मला इंजिनियर म्हणून काम करण्यापेक्षा प्रकाशनात काम करायला आवडेल आणि माझा मोर्चा प्रकाशनातील बारकावे, लेखक-प्रेस, चित्रकार, बाईंडर यांची कार्यपद्धत समजून घेण्याकडे वळला. मी जसजसा यात रस घेऊ लागलो. तसतसा त्यात गुरफटत गेलो व मला त्यामुळे आत्मिक समाधान लाभते असा भास होऊ लागला.

मी आता प्रकाशनाची, वितरणाची सर्व जबाबदारी स्वतंत्रपणे हळूहळू स्विकारत गेलो व माझ्या लक्षात देखील आले नाही की, मी आता प्रकाशक, वितरक म्हणूनच की काय जन्माला आलो आहे. शरद काळे, अरुण साधू, डॉ. भारतकुमार राऊत यांची पुस्तके लक्षपूर्वक तयार करुन प्रकाशित केलीत आणि मग मधू मंगेश कर्णिकांची पुस्तके प्रकाशनाला मिळू लागलीत. त्यांच्या शालीन व्यक्तीमत्त्वाने मी भारावून गेलो. १२ वर्षानंतर त्यांनी लिहिलेली 'राजाथिबा' ही कादंबरी मला प्रकाशित करण्यासाठी मिळाली. डॉ.भारतकुमार राऊत तर मला त्यांच्या कुटुंबातील घटक समजू लागलेत. शिस्तप्रिय, काटेकोर व स्वच्छ प्रतिमेचे शरद काळे साहेब यांच्याशी देखील जवळिकेचे संबंध आले. मला पटलं की, इंजिनियरिंगची नोकरी सोडून मी चूक केलेली नाही. अन्यथा, या दिग्गज मंडळीच्या सान्निध्यात मला येताच आले नसते.

प्रकाशनाचा कॅनव्हास जसजसा वाढत गेला तसतशा ओळखी घट्ट नातं विणू लागल्यात. मग डॉ. महेश केळुसकर भेटलेत. त्यांचा काव्य संग्रह व ललित लेख संग्रहाचे पुस्तक प्रकाशित करावयाची संधी

मला लाभली. डॉ. विलास खोले यांची २ पुस्तके प्रकाशित केल्यानंतर आता आणखी २ पुस्तके प्रकाशित करण्याची मला संधी लाभत आहे. अनंत कदम यांची १७/१८ पुस्तके प्रकाशित केलीत. ते तर मला मानसपुत्रच समजतात. प्रा. पु.द.कोडोलीकर सरांच्या आवाजात एवढे मार्दव आहे की हे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व मला प्रेमाने जवळचा समजतात. कवी आर.एम.पाटील हे केळवे भूषण आहेत. त्यांच्या पुस्तकांमधून त्यांच्या विशालह्रदयी व्यक्तिमत्त्वाची मला जाणीव झाली.

पद्मश्री मधु मंगेश कर्णिकांच्या सल्ल्यानुसार आम्ही उत्तर महाराष्ट्र मराठी साहित्य सभा स्थापन केली. त्यांच्या अनुभवाचा भरपूर उपयोग करुन मी कार्याध्यक्ष म्हणून ते नावारुपास आणण्यासाठी झटतो आहे. अनेक प्रकाशन समारंभ आयोजित केलेत. आता प्रकाशनाचा ४० वा वाढदिवस साजरा करतांना काहीतरी दिव्यभव्य करता यावे या उद्देशाने मधुभाईंना आग्रह धरला की, तुमचे निवडक साहित्य एकत्रित प्रकाशित करण्याची संधी मला द्यावी. मधुभाईंनी दिलदारपणे स्वत: मेहनत घेऊन त्यांच्या प्रकाशित विशाल ग्रंथसंपदेतून साहित्याची निवड केली. आज त्यांची ३ पुस्तके प्रकाशित करण्याचा सुवर्णयोग मला लाभला. त्याचबरोबर डॉ. महेश केळुसकर साहेबांनी आकाशवाणीवर कार्यरत असल्यामुळे आवाजाबद्दल शास्त्रीयदृष्ट्या माहितीपर पुस्तक तयार केले होते. ते पुस्तक निवेदक, वृत्तनिवेदक, पत्रकार, शिक्षक, रंगकर्मी यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. कारण त्यांनी स्वरसाधनेचा सांगोपांग अभ्यास केलेला आहे. तसेच कोकणचे मूळ रहिवाशी व सध्या को.म.सा.प.चे केंद्रीय अध्यक्ष असल्यामुळे कोकणातील चालीरिती, लोककला यावर आधारित ३ पुस्तके लिहिलीत. अशा त्यांच्या एकूण ४ पुस्तकांचे प्रकाशन आज करतांना मला अतीव आनंद होत आहे.

प्रकाशन क्षेत्रात येणारे भलेबुरे अनुभव मी गेले १५ वर्षे घेत आलो आहे. विसरून जावेत असे अनुभव देखील माझ्या वाट्याला आलेत. परंतु त्याहून अधिक आपुलकीनं मला साद घालणाऱ्या व्यक्ती मला लाभल्यात हा आनंद त्याहून मोठा आहे. माझे प्रेसवाले, बाईंडर पुण्याला असतात तर माझे संगणक जुळणीकार ठाणे, पनवेलला असतात आणि आज प्रकाशनविश्वात चित्रकार म्हणून चमकणारा 'हिरा' सतीश भावसार डोंबिवलीला असतो. तसेच दुसरे चित्रकार रघुनाथ गुराम हे देखील डोंबिवलीचेच रहिवाशी. माझे लेखक व ही सर्व मंडळी मिळून आमचा अनघा परिवार बनला आहे. एकमेकांच्या अडचणी समजून घेत हा परिवार आता एकजीव झालेला आहे.

अनघा प्रकाशनाचे यश हे कुणा एकट्याचं नाही तर या सर्व घटकांचे आहे यात तिळमात्र शंका नाही. अशीच आपणा सर्वांची साथ नेहमी मिळत रहावी अशी यानिमित्ताने मी देवाजवळ प्रार्थना करतो.

आजच्या समारंभासाठी पद्मश्री वामन केंद्र साहेब लाभलेत तर डॉ. सुहास पेडणेकर साहेब, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ हे विशेष अतिथी म्हणून आणि प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भारतकुमार राऊत, माजी खासदार लाभलेत. दोन्ही दिग्गज लेखकांच्या साहित्यावर डॉ. विलास खोले व प्रा. अनंत देशमुख हे ज्येष्ठ समीक्षक बोलणार आहेत हा योग माझ्यासाठी दुर्मीळ असा भव्यदिव्य आहे.

**- अमोल नाले**

# मधु मंगेश कर्णिक-व्यक्ती लेखक आणि संस्था

आधुनिक मराठी साहित्याच्या पटावर कोकण आणि आजूबाजूच्या परिसराचे आपल्या प्रतिभेने ठसठशीत चित्रण सातत्याने आणि कसदारपणे करणाऱ्या लेखकांमध्ये वि.स.खांडेकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, जयवंत दळवी, चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या बरोबर मधु मंगेश कर्णिक (जन्म : २८ एप्रिल १९३१) यांचे नाव आवर्जून घेतले जाते.

कर्णिक या आपल्या आडनावाच्या व्युप्तत्तीविषयी त्यांना त्यांच्या चुलत्यांनी सांगितलेली माहिती 'करुळचा मुलगा' मध्ये अशी दिली आहे: 'आपण कर्णिक म्हणजे 'न्यायकर्णिक'. कौटिल्याच्या राज्यशास्त्रामध्ये मुख्य न्यायाधीशांना 'प्राड्निवाक' म्हणत. त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या न्यायाधिशाला 'धर्माध्यक्ष' किंवा 'न्यायकर्णिक' म्हणत. कालांतराने त्यातील 'कर्णिक' तेवढं उरलं. आता ते कर्णिक आपण. हा किताब पेशव्यांनी दिला. कायस्थ व सारस्वत यांमध्येच कर्णिक आढळतात. सारस्वतांमध्ये 'कर्णिक' हे फक्त करूळचे!'

खरे तर मधुभाईंना आजोबांकडे समृद्ध वारसा लाभला होता. त्यांचे आजोबा रावजी रघुनाथ कर्णिक यांनी 'हिंदुधर्म' (१८९६) नावाचे पुस्तक लिहिले होते. वडील मंगेशदादा करुळला 'पोथीवाचन' करीत. 'करमणूक', 'मनोरंजन', 'लोकमान्य', 'केरळकोकिळ', 'चित्रमयजगत' या नियतकालिकांची वर्गणी भरत. त्यांची आई 'नेहमीच ऐकत राहाव्यात' अशा गोष्टी सांगायची. (हे सारे मधुभाईंना पुढे लेखक म्हणून घडण्यात उपयुक्त ठरले.)

पुढे परिस्थितीवशात दिवस बदलले. कुटुंबातील कर्त्या व्यक्तींची पडझड झाली. पण शाळेतील शिक्षकांनी - मोडकमास्तरांनी त्यांच्यातले लेखनगुण ओळखले, शाळेतील हस्तलिखित तयार करायला प्रवृत्त केले. वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी व्हायला त्यांनी मदत केली. काय वाचायचे याचे मार्गदर्शन केले, लेखनाला उत्तेजन दिले. ओरोसकरमास्तरांनी कणकवलीच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला. त्यातच मालवणच्या पारुजी नारायण मिसाळ यांनी आपल्या 'बालसन्मित्र' या नियतकालिकात तरुण मधुभाईंच्या कथा-कविता प्रसिद्ध केल्या. त्यामुळे 'आपण लेखन करू शकतो' असा आत्मविश्वास त्यांना मिळाला. पण एस.एस.सी. झाल्याझाल्या त्यांना नोकरीसाठी प्रयत्न करावे लागले आणि विजयदुर्ग इथल्या एस.टी. कार्यालयात त्यांना 'रायटर' म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांना अनेक माणसे पाहण्याची संधी लाभली, अनेक अनुभव लेखनातून व्यक्त करायचा ते प्रयत्न करू लागले. रत्नागिरीला एस.एस.सी. परीक्षेकरिता ते आले तेव्हा चिं.त्र्यं. खानोलकर यांच्याशी ओळख झाली. विजयदुर्गला श्रीपाद काळे कथाकार भेटले. त्यांची कोल्हापूरला बदली झाली. तिथे

वि.स.खांडेकर, रणजीत देसाई, व. ह. पिटके, विजया आपटे (पुढे राजध्यक्ष), शंकर पाटील हे समानशील भेटले. त्यांच्यात 'सत्यकथा' च्या ताज्या अंकांवर आणि नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या साहित्यावर चर्चा होत. त्या ऐकून मधुभाई साहित्यविश्वाकडे झपाट्याने ओढले गेले. तिथेच गोविंदराव टेंबे यांचा सहवास लाभला. त्यांच्याकडे होणाऱ्या साहित्य-संगीतादी कार्यक्रमात ते रमू लागले. मुंबई, पुणे या भागातील वृत्तपत्रांत आणि नियतकालिकांत त्यांच्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या. लेखक म्हणून 'मधु मंगेश कर्णिक' हे नाव मराठी साहित्यविश्वात परिचित व्हायला लागले. त्यात त्यांच्या सौम्य स्वभावामुळे, मनमिळावू वृत्तीमुळे त्यांचा मित्रपरिवार वाढू लागला.

१९५५ ते २०१९ इतका प्रदीर्घ काळ ते लेखन करीत राहिले. आजही त्यांची प्रतिभा तितक्याच जोमाने कार्यरत असते. मधुभाईंचे वैशिष्ट्य असे की कथा(संग्रह) (४१), कादंबरी (१२), नाटके (२), व्यक्तिचित्रे (३), ललित (८) या विविध वाङ्मयप्रकारांमध्ये त्यांनी लक्षणीय लेखन केले. इतकेच नव्हे तर कविता (१), आत्मचरित्र (१), पटकथालेखक आणि पर्यावरणविषयक चर्चात्मक लेखन (जैतापूरची बत्ती) ही त्यांनी केले आहे. दरम्यानच्या काळात मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'आलमगीर' या चं.वि.बावडेकर यांच्या साप्ताहिकात त्यांनी काही व्यक्तिचित्रे ('मालवणी मुलखांतील माणसे' हे सदराचे मूळ नाव) लिहिली. ती वाचकांना विलक्षण भावली. ती पु.ल.देशपांडे यांच्या वाचनात आली. त्यांनी बावडेकरांपाशी मधुभाईंच्यासंबंधी चौकशी केली. मालवणला 'अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन' होणार होते. आपल्या व्यक्तिचित्रांचे पुस्तक करायचे आणि स्वखर्चाने प्रसिद्ध करायचे असे मधुभाईंनी ठरवले. त्याला पु.ल.देशपांडे यांनी आनंदाने प्रस्तावना दिली आणि तयार झालेल्या पुस्तकाच्या प्रती त्यांनी स्वतःच त्या साहित्यसंमेलनात फिरून विकण्याचा प्रयत्न केला. 'कोकणी ग वस्ती' हे ते पुस्तक होय. यानंतर मात्र त्यांनी मागे वळून असे पाहिले नाही. कथाकार-कादंबरीकार म्हणून त्यांचा मराठी साहित्यविश्वात चांगला बोलबाला होऊ लागला. 'पारध' शिकारकथा (१९६०), 'तोरण' (त्याचे मूळ नाव 'मंत्र' होते. त्यात चाळीस कथांचा समावेश होता. त्याला राज्य पुरस्कार मिळाला. या संग्रहाविषयी मधुभाईंनी पुढीलप्रमाणे लिहीले आहे: 'या कोकणातील माणसांच्या, त्यांच्या सुखदु:खांच्या, गुराढोरांच्या, झाडापेडांच्या आणि वारा-पावसाच्या कथा आहेत.') (१९६३), 'भुईचाफा' (१९६४), 'तहान' (१९६६), 'झुंबर' (१९६९), 'केवडा' १९७३), 'काळे कातळ, तांबडी माती' (१९७८), 'लामणदिवा' (१९८३), 'दखल' (१९८४), 'चटकचांदणी' (१९८५) हे त्यांचे संग्रह प्रसिद्ध झाले. आजवर त्यांनी जवळजवळ सहाशेवर कथा लिहिल्या. या कथांमधून केवळ कोकणच्याच नव्हे तर अन्यत्र आढळलेल्या व्यक्तींच्या सुखदु:खाच्या भिन्न भिन्न परी त्यांनी चित्रित केल्या. मानवी स्वभावाचे अनेकविध रंग त्यांनी कमालीच्या कुशलतेने

रंगविले. जीवनातील समग्रतेचा आणि साकल्याचा, कुरूपतेचा आणि मांगल्याचा तितक्याच उत्कटतेने शोध घेतला आणि विशेष म्हणजे त्यातून ते सकारात्मक दृष्टिकोन मांडत आले आहेत.

त्यांनी 'देवकी' (१९६२) ही पहिली कादंबरी लिहिली. 'कोकणी ग वस्ती' मधील 'कस्तुरी भाविणी'वर मधुभाईंनी नभोनाट्य लिहिले. त्यानंतर त्या नभोनाट्यावर आधारित ही कादंबरी त्यांनी लिहिली. ती कोठावळे पुरस्कार स्पर्धेत त्यांनी पाठवली. तिला तो पुरस्कार मिळाला. १९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह येऊ लागले होते. दरम्यानच्या काळात नोकरीतील बदलीमुळे मधुभाईंना विविध ठिकाणी जावे लागले. ते मुंबईला आले तेव्हा सांताक्रूझ येथे 'सुंदरलाल चाळी'त त्यांना भाड्याने घर मिळाले. आजुबाजूला फारशी चांगली म्हणजे पांढरपेशी वस्ती नव्हती. झोपड्या वाढल्या होत्या आणि उत्तर आणि भारतातील भिन्न भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले लोक तिथे राहात होते. त्यांचे जीवन, लोकविलक्षण वर्तन मधुभाईंमधला कलावंत पाहात होता. त्यावर आधारित, 'माहीमची खाडी' (१९६९) ही कादंबरी त्यांनी लिहिली. ती विलक्षण गाजली. त्याच्या आधी जयवंत दळवी यांनी 'चक्र' नावाने कादंबरी त्यांनी लिहिली होती त्यामुळे 'महानगरीय जीवनजाणिवा व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या' म्हणून त्यांचा बोलबाला झाला. 'माहीमची खाडी' या कादंबरीवर तेव्हा परिसंवादही घेण्यात आला. मराठी समीक्षकांनी आणि रसिकांनी 'माहीमची खाडी' या कादंबरीला डोक्यावर घेतले. तिच्यातील अनुभवविश्व, तिची भाषा, तिचे आविष्काररूप, तिच्यातील ठसठशीत आणि लोकविलक्षण व्यक्तिचित्रण यांनी मराठी वाचकांवर मोहिनी घातली. 'कातळ' (१९८६) या कादंबरीत कोकणातील समृद्ध, संपन्न आणि सतत माणसाला देत राहाणारा निसर्ग आणि त्याचे हे दातृत्व समजून घेण्यात अपुरा पडणारा कोकणी माणूस यांचे चित्रण ते करतात.

'संवेदनाशून्य सरकारी अधिकारी आणि त्यांचे भ्रष्ट वर्तन यावर 'सनद' (१९८६) मध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे. 'वारूळ' (१९८८), 'संधिकाल' (२००१) मध्ये जवळजवळ अर्धशतकातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय स्थित्यंतराचे विशाल दर्शन त्यांनी घडविले आहे. 'सूर्यफूल' (१९६४) मुळात 'वणवा' या शीर्षकाने ही कादंबरी एका पंगू मुलाच्या भावविश्वासंबंधीचा चटकादायक अनुभव चित्रित करते. 'निरभ्र (१९७३) 'भाकरी आणि फूल' (१९७२) या कादंबरीच्या स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली तरी दलित समाज जिथे होता तिथेच राहिला आहे, विकासाच्या खुणा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत, असा मन विदीर्ण करणारा अनुभव त्यांनी रंगवला आहे. जुईली या कादंबरीत जुईली' या तरुण, संवेदनशील तरुणीच्या भावविश्वाचे सक्षम चित्रण केले आहे. 'राजा थिबा' ही तर चरित्रात्मक कादंबरी असून ब्रह्मदेशचा राजा ब्रिटिशांचा कैदी होऊन रत्नागिरीला होता, त्या प्रसंगाला केंद्रवर्ती ठेऊन मधुभाईंनी ही कादंबरी लिहिली आहे.

तारकर्ली (२०१८) मधुभाईंच्या कादंबऱ्यांच्या आशयप्रदेशाविषयी इतके विस्ताराने लिहिले याचे कारण एक संवेदनशील कलावंत म्हणून ते समकालीन आणि पूर्वकालीन वास्तवाला कसा प्रतिसाद देत होते आणि आवश्यकता पडली तेव्हा ते लेखनाचे कसे प्रयोग करीत होते ते लक्षात यावे म्हणून. 'देवकी' च्या संदर्भात अनुभवान्तरासंबंधी आपण तुलनात्मक विचार करू शकतो आणि रूढार्थाने कथानक नसलेल्या 'संधिकाल' मध्ये भिन्न घटना-प्रसंग-पक्ष-प्रवृत्ती यांचे चित्रण त्यांनी कसे केले आहे हेही अभ्यासू शकतो.

मधुभाई मुंबईला आले आणि त्यांनी मराठी साहित्यविश्वात विस्तीर्ण आणि विराट दर्शन घडले. 'मौज'- सत्यकथा', 'ललित', 'नवनीत', 'दीपावली' अश वेगवेगळ्या वाङ्मयीन अड्ड्यावर ते जाऊ लागले. नवनवीन लेखक आणि लेखनाची ते स्वत:ला जोडू लागले. कळत नकळत समकालीन कथा-कादंबरीमधील प्रवाहांचा त्यांचा अभ्यास चालू झाला. मुंबईच्या साहित्यविश्वाशी एकजीव झालेल्या पुणे-कोल्हापूर-नागपूर-औरंगाबाद इथल्या साहित्यिकांशी त्यांचा स्नेह वाढला. 'अबीरगुलाल' आणि 'लागेबांधे' या दोन सामन्यांमध्ये मधुभाईंनी लिहिलेली व्यक्तिचित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. तर 'सोबत', 'जिवा भावाचा गोवा', 'नैॠत्येकडील वारा', 'माझा गाव माझा मुलुख', 'मातीचा वास', 'हृदयंगम', 'नारळपाणी', 'विहंगम' हे त्यांचे ललितलेख संग्रह आहेत.

दरम्यान त्यांच्या कथांचा एक संग्रह १९६३ साली 'तोरण' शीर्षकाने जयहिंद प्रकाशनाने प्रकाशित केला होता, त्याला त्या वर्षीचा उत्कृष्ट कथासंग्रहासाठी असलेला पुरस्कार मिळाला. मग पुरस्कार त्यांच्या वाट्याला सातत्याने येत गेले. १९९० साली रत्नागिरी येथे झालेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना' चे ते अध्यक्ष होते. त्या दरम्यान अशी काही घटना घडली की शिवसेना नेते रागावले होते आणि संमेलनात अडथळे निर्माण होण्याची शक्यता होती. शिवसेनेचे नेते सुभाष देसाई हे मधुभाईंना भेटले. मधुभाईंनी अत्यंत समंजसतेने त्यातून मार्ग काढला. साहित्यसंस्था आणि साहित्यसंमेलने यासंबंधी मधुभाईंनी जवळून अभ्यास केला. कोकण, कोकणातील साहित्यिक यांच्यावर सतत अन्याय होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांच्यातला लढवय्या कार्यकर्ता जागा झाला. त्यातून त्यांनी 'कोकण मराठी साहित्य परिषदे' ची स्थापना केली. आज ही संस्था अतिशय सशक्तपणे आणि जोमाने चालू आहे. कोकणातील अनेक साहित्यिकांना त्यामुळे स्वत:चा चेहरामोहरा मिळाला.

आधुनिक मराठी कवितेचे गिरीशिखर म्हणजे कवी केशवसुत, त्यांचा जन्म मालगुंडचा. मालगुंडला केशवसुतांचे स्मारक बांधण्याचे स्वप्न मधुभाईंनी पाहिले आणि अल्पावधीतच आकर्षक स्मारक उभे केले. कवी कुसुमाग्रजांना त्यांनी प्रेमाने उद्घाटनाला बोलावले. आज मालगुंडचे 'कवी

केशवसुत स्मारक' मराठी साहित्यप्रेमींचे आदराचे केंद्र आणि पर्यटनस्थल झाले आहे.

कोकणातील तरुणांना रोजगार मिळावा म्हणून मधुभाईंनी करुळला काचकारखाना उभा केला (१९७४-१९७७). बॅरिस्टर नाथ पै यांच्या स्मरणार्थ शाळा आणि वनराई सुरू केली (१९७८). अथक प्रयत्न करून वेगवेगळ्या ठिकाणाहून आर्थिक मदत मिळवून त्यांनी संस्थांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला.

मधुभाईंनी मराठी साहित्येतिहासाचा एक फार मोठा वैभवशाली, चैतन्यदायी अनेक दिशांनी वाढत-विकसित जाणारा पट अगदी जवळून पाहिला आहे आणि बऱ्याचदा त्याच्याशी ते थेट संबंधित राहिले आहेत. इतकेच नव्हे तर उत्तरायुष्यात 'करुळचा मुलगा' सारखे एक अप्रतीम आत्मचरित्र लिहिले आहे. या कालखंडातील वृत्ती-प्रवृत्तींचा, वाङ्मयप्रकारांचा, विविध वाङ्मयीन घटनांचा, लेखकांचा अभ्यास करणाऱ्यांसाठी तर हे आत्मचरित्र एक महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ ठरावे.

अलिकडच्या काळात जैतापूर अणुऊर्जाप्रकल्पाविषयी वृत्तपत्रांमधून आणि वाहिन्यांमधून बराच खल होत होता. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सामान्य लोक, राजकीय कार्यकर्ते आणि पुढारी यांच्या उलटसुलट चर्चा होत होत्या. जैतापूर-कुवशी-मिठगवाणे-सागवे परिसरात सभा, मोर्चे, धरणे सातत्याने होत होते. पण प्रत्यक्षात प्रश्न काय आहे, त्याची आवश्यकता आणि तीव्रता किती, लोकमत काय आहे वगैरे प्रश्नाचा तास घेण्याचं मधुभाईंनी ठरविले आणि तो सारा परिसर स्वत: पिंजून काढला. ते त्या परिसरातल्या सामान्य नागरिकांना, स्थानिक पुढाऱ्यांना भेटले. प्रकल्प व्हावा म्हणून आणि तो होऊ नये म्हणून कार्यरत असलेल्या सर्व संबंधितांना भेटले आणि त्यांनी हा विषय मुळातूनच समजावून घेतला. पुढे त्यावर त्यांनी लेखन केले. 'जैतापूर बत्ती' हे त्या पुस्तकाचे नाव. ते एक प्रत्यक्ष field-work करून, परिश्रम घेऊन, तौलनिक अभ्यास करून, वस्तुनिष्ठतेने काढलेल्या निष्कर्षांवरील लेखन आहे. वेगळे आणि मौलिक आहे.

हळू हळू मधुभाई केवळ एक सर्जनशील लेखक राहिले नाहीत तर कोकणविषयक आंतरिक आस्थेमुळे ते एक संस्था होत गेले. या संस्थेच्या विशाल छायेत आता अनेकजण शांतपणे विसावा घेत आहेत.

**प्रा. अनंत देशमुख**

८६८९९७८७४४

# एक अतूट नाते

निसर्गाचे भव्य-दिव्य रुप म्हणजे हिमालय ! ह्या स्वर्गीय सौंदर्यात तर कोणीही प्रथम दर्शनीच हरवून जातो. १९९३ साली मला प्रथम हिमालयाचे दर्शन झाले आणि मग मी हिमयात्रेचा वारकरीच झालो. आजही मला ध्यानी मनी स्वप्नी हिमालयच दिसतो.

भारतातील बारा राज्यात हिमालयाच्या रांगा कमी-अधिक प्रमाणात पसरल्या आहेत. त्यापैकी 'उत्तराखंड' हे एक राज्य! निसर्गसौंदर्याने नटलेली, वैशिष्ट्यपूर्ण श्रध्दास्थाने असलेले एक शांत व सुरक्षित राज्य! हे राज्य 'देवभुमी' म्हणून ओळखले जाते. ह्या राज्यात मी खुप भटकलो व जीवनातील सर्वोच्च आनंदाचे क्षण अनुभवले. आणि मग एके दिवशी मनात विचार आला की, हा आनंद सर्वांना अनुभवता आला पाहिजे. ह्या उद्देशाने काही निवडक वैशिष्ट्यपूर्ण स्थानांची माहिती सांगणारे लेख मी काही साप्ताहिकात, वृत्तपत्रात प्रसिद्ध केले; पण नंतर वाटू लागले की हे सर्व पुस्तकरुपात प्रसिद्ध झाले तर ते सर्वांनाच जास्त उपयुक्त ठरेल. पुस्तकाच्या माध्यमातून अशा स्थानांचे पौराणिक महात्म्य, वैशिष्ट्ये, प्रवासाचे मार्ग, प्रवासी सोई-सुविधा मला सांगता येतील. पर्यटकांना, श्रध्दाळू भाविकांना, पदभ्रमंतीची आवड असणाऱ्या निसर्गप्रेमींना ते मार्गदर्शक ठरेल.

पुस्तकाच्या दृष्टीने मी परत लेखन सुरू केले. पण प्रश्न होता की हे प्रकाशित कोण करणार ? मी काही अनुभवी, प्रतिष्ठित लेखक नाही. तरीही २-३ प्रकाशकांना भेटलो. चर्चा केली. त्यांनी परिचय, लेखन क्षेत्रातील अनुभव विचारला व ८-१० दिवसात कळवतो असे सांगितले. ८-१० दिवसांनी त्यांचा नोकर सर्व बाड घरी देऊन काहीच न बोलता निघून गेला. पण अजून ही आशा संपली नव्हती.

आणि एके दिवशी एका समारंभात श्री.मुरलीधर नाले ह्यांची भेट झाली. नालेसाहेब हे 'अनघा प्रकाशन' ह्या अत्यंत प्रतिष्ठित व मान्यवर प्रकाशन संस्थेशी खूप जवळून निगडीत आहेत, हे ऐकून होतो. गप्पा सुरू झाल्या. पुस्तकाचा विषय निघाला. नालेसाहेबांनी घरी येण्याचे निमंत्रण दिले.

रविवारचा दिवस! नालेसाहेबांच्या घरी गेलो. कां ते समजत नाही पण प्रथमदर्शनीच त्यांच्याबद्दल आपुलकी वाटू लागली. त्यांचा आश्वासक चेहरा, बोलणे ऐकून आपलेपणा वाटू लागला. गप्पा सुरू झाल्या शेवटी पुस्तकाचा विषय निघाला. पुस्तकाचा आशय व उद्देश सांगितला. नालेसाहेब शांतपणे ऐकत होते व मग त्यांनी सांगितले, 'लिहा, भरपूर लिहा, लिहिताना कमतरता करू नका. जास्तीत जास्त माहिती लिहा. पाने किती होतात त्याची तुम्ही काळजी करू नका. ती जबाबदारी माझी. जेव्हा

हे पुस्तक वाचक वाचतील, तेव्हा त्यांना पुस्तक वाचून आनंद झाला पाहिजे. पुस्तक पर्यटकांना उपयोगी, मार्गदर्शक ठरले पाहिजे. पुस्तकाची भाषा सोपी ठेवा. पुस्तकातून ज्ञान, माहिती व मनोरंजन झाले पाहिजे. ह्याची काळजी घ्या. त्यांनी लगेच पुस्तकाचा नामकरण समारंभ केला व पुस्तकाचे नांव ठेवले 'हिमशिखरांच्या सहवासात'.

खरंच, मला आश्चर्य वाटते ह्या व्यक्तिचे की मला लेखनाचा कोणताही अनुभव नसताना त्यांनी माझ्यावर एवढा मोठा विश्वास टाकला. मला लिहायला प्रवृत्त केले; प्रोत्साहन दिले. अशी व्यक्तिमत्त्वे विरळाच!

ऑगस्ट २०१५ मध्ये हे माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. आनंदाचा सुखद धक्का मला बसला. 'माझे पुस्तक! मी लिहिलेले पुस्तक!' ही भावनाच काही वेगळी असते. मनात विचार आला, हे नालेसाहेब खरंच सरस्वतीचे निस्सिम भक्त आहेत. असे पुस्तकरुपी किती अलंकार त्यांनी सरस्वती देवीच्या चरणी अर्पण केले असतील. माझ्यासारख्या काहीही अनुभव नसलेल्या किती होतकरुंना त्यांनी 'लेखक' ही उपाधी मिळवून दिली असेल! आणि काही दिवसात महाराष्ट्र, मध्यप्रदेशातून वाचकांचे पुस्तकाचे प्रशंसा करणारे फोन मला आलेत. श्री. अमोल नाले ह्यांच्या वितरण व्यवस्थेमुळे पुस्तक सर्वदूर पोहचले होते.

आणि एके दिवशी वडिलकीच्या हक्काने मला नालेसाहेबांचा फोन आला. त्यांनी सांगितले, दुसरे पुस्तक लिहायला सुरवात करा. तुमच्या पहिल्या पुस्तकाला शासनमान्यता मिळाली आहे.

नालेसाहेबांच्या आशीर्वादाने माझे दुसरे पुस्तक 'हिमशिखरांच्या सान्निध्यात' हे एप्रिल २०१८ मध्ये 'अनघा प्रकाशनाने' प्रकाशित केले. उत्तराखंडातील काही वैशिष्टपूर्ण स्थानांची माहिती सांगण्याचे माझे स्वप्न 'अनघा प्रकाशना'मुळे साकार झाले.

आज मी वैचारिक संपन्न अशा 'अनघा प्रकाशन' ह्या कुटुंबाचा एक सदस्य आहे. नाले साहेबांचे आशीर्वाद व ह्या माझ्या कुटुंबातील सदस्यांच्या शुभेच्छा माझ्याबरोबर आहेत. त्यांचे मार्गदर्शन, मदत मला सदैव मिळत असते, त्यातच मी तृप्त आहे.

"खरंच आमचं नातं अतूट आहे."

**- प्रकाश लेले**

# पुस्तक परीक्षण - हिमशिखरांच्या सहवासात

### गवसला हिमालयातला खजिना

एखादा दागिना आपण विकत घेतो आणि तो जेव्हा पुन्हा-पुन्हा घालतो तेव्हा तो एक प्रकारचा आनंद देत असतो. तसंच एक पुस्तक मला भेटीच्या रुपात मिळालं आणि दागिन्यासारखं ते मला पुन्हा-पुन्हा वाचायला प्रेरित करतं. वेगवेगळ्या विषयावरची पुस्तकं म्हणजे माझे वेगवेगळे दागिने. त्यात मला आत्मचरित्र आणि प्रवासवर्णनं वाचायला जास्त आवडतं. तसंच देश परदेशाची ओळख, तिथली अनेक स्थळं, तिथला इतिहास मला भावतो, भेटीच्या रुपात भव्यदिव्य हिमालयच मला शब्दरूपात गवसला. खरं तर 'हिमशिखरांच्या सहवासात' हे पुस्तक, पुस्तक नसून एक उत्तराखंडातला खजिनाच आहे. सामर्थ्यवान लेखणीतून, ओघवत्या शब्दशैलीतून, प्रकाश लेले यांनी ते वर्णन उत्तमरित्या मांडलं आहे.

'हिमशिखरांच्या सहवासात' हे पुस्तक वाचकाला खरोखरच हिमालयाचा सहवास घडवतो. वाचकाला वाचताना तो प्रवास करतोय आणि ते वातावरण, तिकडचं थंड हवामान, वेगवेगळी देवस्थानं, तिकडचे रस्ते, चढ-उतार, वळणं, तिकडची लोकवस्ती, सोयी सुविधा आणि यात भर म्हणजे त्या देवभूमीच्या अनेक कथा, लोककथा अशा माहितीपूर्ण हिमालयाचा खजिनाच त्याला गवसतो. विशेष म्हणजे प्रकाश लेलेच्या लेखणीतून मला या उत्तराखंडातील हिमालय म्हणजे तिथली शिवस्थानं (पंचकेदार), तसंच विष्णूस्थान (पंचवद्री) याचं वर्णन करताना लेखक त्या देव-देवतांचे पावित्र्य वाढवतो.

मग पुढे-पुढे आपण भुवनेश्वर, नंदराज जटयात्रा, केदारनाथ, मध्यमहेश्वर, तुंगनाथ, रुद्रनाथ, कल्पेश्वर, गोमुख, पुर्णागिरी अशा प्रत्येक ठिकाणांचा प्रवास करतो. प्रत्येक वेळी आपल्या डोळ्यासमोर हिमालयाचं स्वर्गीय आणि विशाल सौंदर्य नजरेसमोर उभं राहतं. विशेष म्हणजे तिकडच्या देव-देवतांच्या कथा, काही लोककथा अधिक मनोरंजक पद्धतीनं मांडल्या आहेत. गढवालमधील पंचप्रयागचे वर्णन करताना प्रत्येक नदीचा उगम, त्या नद्यांचा प्रवाह त्या एकत्र प्रवाह करतात त्या प्रत्येक प्रयागचं (पाच प्रयाग) वर्णन अतिशय सुंदररित्या केलं आहे. प्रकाश लेले या लेखकाने या धार्मिक स्थळाव्यतिरिक्त हेमकुंड आणि जिम कार्बेटची अतिशय सुंदर अशी माहिती दिली आहे.

हे पुस्तक विशेष आवडण्याचं कारण म्हणजे पदभ्रमंती करणाऱ्यांना हे मार्गदर्शक तर आहेच, त्याच बरोबर प्रकाश लेले यांनी प्रवास करताना काय काळजी घेतली पाहिजे हे अतिशय माहितीपूर्ण लिहिलं आहे. हे पुस्तक प्रवास करताना संग्रही असावं आणि सतत वाचावंसं वाटतं.

**पूर्णिमा शेंडे, चेंबूर**

## खिरमट

डॉ. महेश केळुसकर यांनी वेळो वेळी लिहिलेल्या लेखांचे संकलीत पुस्तक म्हणजे ‘खिरमट’. खिरमट या नावापासूनच पुस्तकाच्या एकूण प्रकाराविषयी उत्सुकता निर्माण होते. सतीश भावसारांचे मुखपृष्ठ आणि अनघा प्रकाशनच्या नालेंची सुबक छपाई आणि बांधणी ही या पुस्तकाची दुसरी देखणी बाजू आहे.

‘खिरमट’ हा कोकणात प्रचलित असलेला शब्द आहे. ज्यांच्या रम्य बालपणाचा काही काळ कोकणात गेलाय त्या प्रत्येकाच्या जीभेवर या शब्दाची चटक असायलाच हवी. आंब्याच्या कच्च्या, ताज्या कैऱ्या तोडून त्याचे बारीक तुकडे करुन लाल तिखट, मीठ, गुळ व थोडेसे तेल टाकून आंब्यांच्या फोडीला आणि इतरांच्या तोंडाला पाणी सुटेपर्यंत एकत्र घोळवायचा आंबटगोड ऐवज म्हणजे ‘खिरमट’!

या पुस्तकात डॉ. केळुसकरांच्या लेखांपैकी एकूण ६० लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. अर्थात ते सगळे लेख आंबट, गोड, तिखट, तुरट अशा सगळ्या रसांच्या चवी डोक्यात घोळवत रहातात. महेश केळुसकरांची लिखाणाची एक विशिष्ट शैली आहे. ती इतकी नैसर्गिक आहे की तशी जोखीम घेऊन लिहिणे म्हणजे सगळ्या दांड्या मोकळ्या सोडून पुढे जावून चटकन चेंडू स्टेडियममध्ये भिरकावल्यासारखा आकर्षक आणि बेधडक प्रकार आहे. प्रत्येक वाचकाला अधून मधून ही खेळी दाद द्यायला लावते. समाज प्रबोधन, राजकारण, मराठी भाषा आणि कविता या वरचे चिंतन, कोकणातल्या गजाली तर घरंदाज वसई वरचे भाष्य अशा वेगवेगळ्या विषयांना अगदी साध्या सोप्या भाषेत लेखकाने मोजक्या शब्दात मांडलेले आहे. ‘पुस्तक मिटून ठेव’ ‘उन्हाची कवटी’ ‘नावात काय आहे’ ‘जयंती’ हे आणि असे अनेक लेख अस्वस्थ करतात. ‘नेन्याचो गजाली’ “काय बो!” अशा काही लेखातून कोकणातील एकूण वातावरणाचे जिवंत चित्रण केळुसकरांनी केलेले आहे. त्यांच्या कथानकात वावरणारी माणसे अगदी अस्सल, त्या मातीतली आहेत असे वाटते. आंब्याच्या बागेकडून जातांना आंब्यांचा मोहराचा वास जसा अस्सल, मन मोहक वाटतो तसे काहीसे वाटत रहाते. ‘वर्गमित्र’ या लेखात तर गावातले लहानसे मारुतीचे देऊळ, त्याच्यातच भरणारी लहान मुलांची चिवचिव शाळा, समोर उभा असलेला गदाधारी शेंदूर विलेपित मारुती, देवळातला विशिष्ट अगरबत्ती तेलाचा सात्विक वास ही सगळी गावं खेड्यातली शैक्षणिक सुबत्ता डोळ्यासमोर भाबडेपणाने उभी रहाते. लेखकाच्या शब्दातील ताकद जाणवत रहाते. ‘शेपूट, ‘मराठी मराठी’, ‘जयंती’, ‘बाबा आबा दादा’, ‘वाद्य’ असे कितीतरी लेख सध्याचे गलिच्छ राजकारण दांभिक समाज सेवा, जयंत्या पुण्यतिथ्यांचा घोळ या सगळ्यावर झगझगीत प्रकाश टाकणारे आहेत. ‘नावात काय आहे?’ हा लेख तर खूपच बोचरा आहे. ‘सृष्टी आणि दृष्टी’ ‘हायकू’ गुढी हे जसे विचार प्रवर्तक लेख आहेत ‘सुरक्षा बंधन’ हा सुद्धा देशाच्या संरक्षणाकरीता विशेषत: १५१७ कि.मी. समुद्र किनाऱ्याच्या रक्षणासाठी सुचविलेला वेगळाच आणि महत्वाचा विचार लेखकाने मांडलेला आहे. तर ‘उन्हाची कवटी’ हा एक वेगळ्याच उंचीवर नेणारा, एका तंद्रीत लिहिलेला, जाणीवांना गुंगी देणारा असा सुंदर लेख आहे. ‘आषाढातल्या आठवणी’ पुन्हा एकदा पावसाळ्यातल्या सर्द ओल्या जाणीवांना आठवणींच्या पागोळ्यांखाली वाचकाला भिजायला लावतात.

खरं तर, डॉ. महेश केळुसकरांची ही ‘खिरमट’ इतकी मस्त जमलीय की त्याचा आस्वाद रसिकांनी घ्यायलाच हवा.

**- शशिकांत तिरोडकर**

# पद्मश्री मधु मंगेश कर्णिक

आता अनघा प्रकाशनाची ४० वर्षे पूर्ण होत आलीत. सुरुवातीपासून मधु मंगेश कर्णिकांना प्रकाशनासाठी पुस्तक द्यावे म्हणून आग्रह करीत होतो. अनघा प्रकाशनाचा रौप्यमहोत्सव २००४ मध्ये मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील एसी हॉलमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते ३३ पुस्तकांच्या प्रकाशनाने थाटात साजरा झाला. वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॉनिक मेडियाने त्याची भरपूर प्रसिद्धी केली. कारण कार्यक्रमाला ३३ लेखक जातीने हजर होते. त्यात माधव गडकरी, यशवंत देव, वसंत भालेकर, इसाक मुजावर, डॉ. मोहिनी वर्दे, डॉ.सिसिलिया कार्व्हालो, परेन जांभळे, जोसेफ तुस्कानो, अनंत कदम, अशोक जैन, अशोक राणे तसेच वसई केळवे परिसरातील लेखक जातीने कार्यक्रमाला हजर होते. सुरुवातीपासून २६/२७ वर्षे कर्णिक साहेबांना प्रकाशनासाठी पुस्तक देण्यासाठी दरवर्षी विनंती करीत होतो. अखेर तो दिवस उजाडला. त्यादिवशी मधु भाईंनी १ स्क्रिप्ट देण्याचे मान्य केले. त्या स्क्रिप्टचे प्रुफ डोळ्याखालून घालण्यासाठी पाठवले तर ते बघून झाल्यावर त्यांनी त्याबरोबर दुसरे स्क्रिप्ट पाठवले. त्यांची दोन्ही पुस्तके प्रकाशित केलीत. त्यांना ती आवडली. त्यांच्यावर म.टा.मध्ये छान परीक्षणे आलीत. त्यांना आनंद झाला. ती होती 'विहंगम' व 'हृदयंगम' ही पुस्तके.

दोन पुस्तकांच्या प्रकाशनानंतर एकेदिवशी त्यांचा फोन आला व त्यांनी घरी भेटायला बोलावले. घरी गेल्यावर त्यांनी माझ्या हातात ३ पुस्तकांचे स्क्रिप्टस् दिलेत. ती पुस्तके अनघा प्रकाशनाच्या निर्मितीच्या दर्जाने प्रकाशित केलीत. ती पुस्तके होती. 'नैॠत्येकडील वारा', 'कोवळा सूर्य' व 'जीवाभावाचा गोवा'. अनघा प्रकाशनाचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सतीश भावसार यांची कव्हरवरील चित्रे मधू भाईंना आवडली आणि या पाच पुस्तकांच्या प्रकाशनामुळे मधु मंगेश कर्णिक हे आमचे मधू भाई बनले. त्यांच्याशी लेखक प्रकाशक हे नाते कधी गळून पडले हे समजलेच नाही. आपुलकीचे नाते आपसूक विणले गेले.

स्नेहाच्या नात्यानं मधू भाईंनी आग्रह धरला की, मी उत्तर महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांसाठी उत्तर महाराष्ट्र मराठी साहित्य सभा तयार करावी. त्यांनी कोकणातील साहित्यिकांना जसे हक्काचे व्यासपीठ निर्माण केले तसे मी आमच्या खानदेशातील जिल्ह्यांसाठी करावे ही त्यांची इच्छा. त्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. त्यानुसार त्यांनी सर्व मदत केली. एवढेच नव्हे तर जळगांवला आयोजित केलेल्या साहित्य संमेलनात ते प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहिलेत. या स्नेहाळ संबंधातून मधूभाईंनी १२ वर्षांनी लिहिलेली कादंबरी मला प्रकाशनासाठी दिली. ती होती 'राजाथिबा'. मधू

भाईंनी ही कादंबरी मोजक्या पानांमध्ये मोठा आशय व प्रवाही कथेचा बाज ठेवून लिहिली होती. दुसऱ्या एखाद्या लेखकाने या मोठ्या विषयावर जाडजूड कादंबरी लिहिली असती.

मधू भाईंच्या दिलदार, अजातशत्रू व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्याकडे त्यांच्या 'करुळचा मुलगा' पुस्तकाचे प्रकाशन असो, त्यांच्या वयाच्या पंच्याहत्तरीचा कार्यक्रम असो की त्यांच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस असो त्या प्रत्येक कार्यक्रमाचे आमंत्रण असायचे. त्यामुळे तिथे हजेरी लावणे हे माझे कर्तव्यच बनले. अगदी मागच्या वर्षी त्यांच्या नातीच्या लग्नाचा स्वागत समारंभ होता त्याला उपस्थित राहाणे हे तसेच अगत्याचे झाले. कारण या प्रत्येक समारंभाच्या आमंत्रणपत्राशिवाय फोनवरुन मधूभाईंच्या मधाळ आग्रहाला नकार देणे कसे काय शक्य होते ? या १४/१५ वर्षाच्या संबंधातून तयार झालेल्या जवळकीतून माझ्या डोक्यात आले की, मधूभाईंचे एवढे आभाळाएवढे व्यक्तिमत्त्व, त्यांची प्रचंड प्रसिद्ध ग्रंथसंपदा आपल्याला मराठी रसिकांच्यापुढे कशी नेता येईल. मी हा विचार स्नेही डॉ. महेश केळुसकरांकडे बोललो, त्यांना कल्पना आवडली. आम्ही दोघे मधू भाईंना भेटलो. बैठकीत त्यांच्या समग्र वाङ्मयातील निवडक भाग काढून त्याची पुस्तके रसिकांना उपलब्ध करुन द्यावी असे ठरले. मधूभाईंनी त्यांच्या कथा, कादंबरी, कविता, ललित, साहित्यविचार, व्यक्तिचित्र, बालवाङ्मय, आत्मचरित्रातील निवडक मजकूर निवडला व त्याची ३ पुस्तके त्यांनी तयार केलेत. ती अनुक्रमे अशी आहेत 'वेचक मधु मंगेश कर्णिक' व 'निवडक मधु मंगेश कर्णिक - भाग -१ व भाग -२' तिन्ही पुस्तकांचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी तयार केलीत व मांडणी देखील त्यानेच केली आहे. पूर्वीच्याकाळी एखाद्या लेखकाच्या समग्र वाङ्मयावर आधारित ग्रंथ तयार होत. त्याचा फायदा विद्यापीठातील विद्यार्थ्यांना एका लेखकाचा अभ्यास करण्यासाठी होत होता. काळाच्या ओघात आता तसे होत नाही. परंतु त्या विचारातून मधू भाईंच्या एवढ्या प्रचंड ग्रंथसंपदेचा निवडकरित्या केलेल्या निवडीचा भविष्यात विद्यार्थ्यांना लाभ व्हावा हीच माझी मनापासून इच्छा. कारण मधू भाईंनी मराठी वाङ्मयातील सर्व वाङ्मयप्रकार निवडलेले आहेत. त्यामुळे साहित्याच्या विद्यार्थ्यांना त्याचा नक्कीच उपयोग होऊ शकेल अशी माझी धारणा आहे.

मधूभाईंच्या विपूल साहित्याएवढेच त्यांचे मन देखील तसेच विशाल आहे. त्यांच्या सान्निध्यात आल्यावर जसे त्यांचे साहित्यविषयक विचार ऐकायला मिळतात तसेच त्यांचे समाजविषयक विचार समजतात व मग त्यांच्या प्रगल्भ विचारसरणीचा साक्षात्कार होत राहतो. मधूभाईंना परमेश्वराने मराठी रसिकांसाठी उदंड आयुष्य द्यावे हीच प्रभूचरणी प्रार्थना.

**- मुरलीधर नाले**